# जेएनएनयूआरएम प्रकल्पांचे पुण्यातच का दिवाळे?

३ नोव्हेंबर, २०११

मीनल इनामदार

GreenEarth


GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd
contactus.greenearth@gmail.com


(पुण्यात फसलेल्या जेएनएनयूआरएम प्रकल्पांचा आढावा)

# जेएनएनयूआरएम प्रकल्पांचे पुण्यातच का दिवाळे?

## जेएनएनयूआरएम व महाराष्ट्र राज्य

'शहरे सुधारली की देश सुधारेल' हा सिद्धांत गृहीत धरून, देशातील महत्त्वाची सर्व शहरे चकाचक, आधुनिक, वेगवान व कार्यक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकारने जागतिक बँकेकडून मिळालेल्या कर्जाच्या आधारे ही महत्वाकांक्षी योजना २००५ मध्ये सुरू केली. मान्यता दिलेले प्रकल्प, व वास्तविकतेत पूर्णत्वास पोहोचलेले प्रकल्प यांचा अभ्यास करता लक्षात येते, की पूर्वाश्रमीच्या वैभवशाली महाराष्ट्र राज्यासाठी सर्वात जास्त योजना व तेवढीच सर्वात जास्त भरघोस पैशांची तरतूद केलेली दिसते. ७८ योजनांसाठी रू. ११,३७० कोटी ! जेएनएनयूआरएम या योजनेतील एकूण प्रकल्प संख्या ५२७, व एकूण तरतूद ६०,००० कोटी. महाराष्ट्राला यातील वाटा - देशातील १४% प्रकल्प, व त्यासाठीची १९% प्रकल्प तरतूद !




## जेएनएनयूआरएम व पुणे शहर

आपला विकास साधायच्या या सुवर्ण संधीचे महाराष्ट्राने, त्याहीपेक्षा पुण्याने काय केले पहा -

पुणे शहराला १४ प्रकल्पांसाठी रू. २,१७६ कोटी मंजूर झाले असताना, आजपर्यंत शहरात निव्वळ २ कामे झालेली दिसतात, एक म्हणजे बीआरटी व बाणेर येथील सबवे. बाणेर येथील एक इमारत जी विक्रेत्यांसाठी बांधली, व अजूनही धूळ खात पडली आहे.

महापालिकेने केंद्राकडून व राज्य सरकारकडून आत्तापर्यंत मिळालेल्या रू. १,०३४ कोटींमधील रू. ६१८ कोटी खर्च केलेले आहेत. देशातील इतर सर्व शहरांमध्ये प्रत्येकी किमान ४ प्रकल्प पूर्ण झालेले दिसत असताना, विद्‌यमान पुणे शहरच का मागे? देशात बंगळूर शहर सर्वात जास्त प्रकल्प पूर्ण करण्यात अग्रेसर असताना व शेजारील गुजरात राज्यातील अहमदाबाद, विशेषतः सूरत यांसारखी शहरे पुणे व मुंबईच्याही पुढे असताना, पुण्याचे अपयश जास्तच खुपते.

२००५-२००९ या कालावधीत जेएनएनयूआरएम अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची यादी-

| State | City | No of projects | Approved cost in Rs lakhs | ACA (additional central assistance) released in Rs lakhs |
|---|---|---|---|---|
| Andhra Pradesh | Hyderabad | 8 | 88362 | 28505.41 |
| | vijaywada | 4 | 7225 | 2707.27 |
| | vishakhapattanam | 5 | 13536 | 5190.9 |
| Delhi | New Delhi | 4 | 25882 | 2259.44 |
| Gujarat | Ahmedabad | 18 | 87084.52 | 28010.24 |
| | surat | 13 | 27627.86 | 13059.45 |
| | vadodara | 1 | 4105 | 2052.52 |
| | rajkot | 1 | 8562 | 4280 |
| Karnataka | Bangalore | 21 | 62160.86 | 14590.53 |
| Madhya Pradesh | Bhopal | 3 | 4123.31 | 1526.46 |
| | Indore | 1 | 631 | 236.64 |
| Maharashtra | Greater Mumbai | 2 | 9443 | 3305.05 |
| | Nagpur | 3 | 6626.39 | 2484.88 |
| | Nanded | 2 | 10128.57 | 8102.88 |
| | Nashik | 1 | 5999.23 | 2249.73 |
| | Pune | 2 | 11039.5 | 4139.81 |
| Tamilnadu | Chennai | 5 | 16788.4 | 7418.02 |
| | Madurai | 5 | 16033.17 | 5933.05 |
| West Bengal | Asansol | 2 | 4331 | 2165.5 |
| | Kolkata | 9 | 31227.4 | 9696 |
| | **total** | **110** | **440916.21** | **147913.78** |